B Socio-Cultural factors
Religious
Historical
Socio Cultural

Ch-5 Transportation & communication
* Infrustructure & support System

Ch-6 Accommodation - निवास सुविधा।
Types of Accommodation

Ch-7 Impacts of Tourism परिणाम
Inviramental Impacts
Iconomic Impacts
Social and cultural

Tourism Geography is the study of travel tourism as an industry and as a social and cultural activity पर्यटन भुगोल म्हणजे प्रवास व पर्यटन यांचा व्यवसाय म्हणून तसेच सामाजिक व सांस्कृतिक क्रिया या अनुशंगाने भौगोलिक अभ्यास होय.

पर्यटन भुगोल प्रवास व पर्यटन व्यवसाय आणि सामाजिक व सांस्कृतिक क्रिया या दृष्टीने अभ्यास होय. थोडक्यात व्यवसाय ~~आणि सामाजिक व सांस्कृतिक क्रिया~~ म्हणून पर्यटन व प्रवास आणि सांस्कृति व सामाजिक क्रिया समजून भुगोलिक अभ्यास होय. व्यवसाय किंवा उदयोग ~~तसेच~~ तसेच सांस्कृतिक व सामाजिक क्रिया समजून पर्यटन व प्रवास याचा भुगोलिक विश्लेषणात्म अभ्यास म्हणजे पर्यटन भुगोल होय.

Scanned by CamScanner

Date
Page

* Travel प्रवास
प्रवास ही मानवाची व सामान्य क्रिया आहे.

1) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मानवाची होणारी हालचाल म्हणजे प्रवास होय.

2) विशेष उद्देशाने वाहतूक माध्यमाद्वारे होणारी मानवी हालचाल.

3) दिर्घ अंतर एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी वाहतूक साधनाच्या द्वारे

4) विविध उद्देशाने होणारी मानवाची हालचाल म्हणजे प्रवास होय.

* पर्यटन Tourism

पर्यटन शब्दाची उत्पत्ती व विविध भाषेतील शब्द

हिंदू - ज्यू [To search]

Torah ↓

↓

Tour Tourism - पर्यटन

↑ ↑

Tornos To Journy

लॅटिन भाषेतील शब्द

Deffination of Tourism Geography

पर्यटन, प्रवास व त्यास पुरक पूरक क्रियांचा क्षेत्रिय विश्लेषणात्मक अभ्यास म्हणजे पर्यटन भूगोल होय.

पर्यटन एक मानवी व्यवसाय म्हणून भूगोलिक अभ्यास करणारी शाखा म्हणजे पर्यटन भूगोल होय.

* पर्यटन भूगोलातील प्रमुख संकल्पना :-

1) प्रवास
2) पर्यटन
3) पर्यटक
4) फुरसतीचा वेळ / विश्रांती
5) मनोरंजन

* पर्यटन - Tourism

नेहमिच्या ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी विशिष्ट काळात प्रवास करणे म्हणजे पर्यटन होय.
संस्कृतमध्ये पर्यटन याचा अर्थ विश्रांती व ज्ञान मिळवण्यासाठी नेहमीच्या ठिकाणापासून इतर ठिकाणी प्रवास करणं असा आहे या शब्दाला समांतर शब्द देशाटन व तिर्थाटन असे आहे
(In the Sanskrit Paryatan means leaving onse's reesidence to travel for the sake of rest and for seeking knowledge)

* देशाटन :

देशाटन म्हणजे आर्थिक फायद्यासाठी प्रवास तर कि तिर्थाटन याचा अर्थ धार्मिक उद्देशाने केलेला प्रवास होय.
थोडक्यात पर्यटन म्हणजे नेहमीच्या ठिकाणापासून, दुसऱ्या ठिकाणी विशिष्ट काळात प्रवास करणे म्हणजे पर्यटन होय.
(Deshatan - is another word wich means travelling for economic benifits, Tirthatan - in the third equ-ivelent which mean travelling for ligious parpose)

* पर्यटन व्याख्या-

1) पर्यटन म्हणजे सर्वसाधारण राहत्या व कामाच्या ठिकाणापासून पर्यन्न ठिकाणी तात्पुरती किंवा अल्पकालिन मानवी हालचाल आणि मुक्काम ठिकाणी वास्तव्य दरम्यानच्या क्रिया विविध उद्देशाने होणाऱ्या हालचाली, एकदिवशीय भेट व सफर होय.
(Tourism Society 1976)

2) नेहमीच्या वातावरणापासून दूर अंतराच्या ठिकाणी प्रवास व मुक्काम दरम्यान एक वर्षापेक्षा कमी कालावधीतील विश्रांती करमणूक, व्यवसाय व इतर उद्देशाने होणाऱ्या मानवी क्रिया म्हणजे पर्यटन होय. (WTO)

Scanned by CamScanner

destination - ठिकाण

Tourism is the temporary short term movement of people destination outside the places where the normally live and work. and ~~as~~ activities during the stay at this destination it include movement for all purpose. as well as day ~~ca~~ visits

(Tourism Socity 1976)

3] एखाद्या राष्ट्रात २४ तासापेक्षा जास्त आणि कायमस्वरुपी वस्ती न करण्याच्या हेतूने महिन्यापेक्षा कमी वास्तव्य करणाऱ्या व्यक्तिस पर्यटक म्हणतात.

4] जो व्यक्ति निसर्ग सौंदर्याचा आनंद मिळवण्यासाठी भ्रमंती किंवा प्रवास करतो त्याला पर्यटक म्हणतात.

5] आक्सफर्ड शब्दकोश - जो उत्कंटेपायी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करतो त्याइला पर्यटक म्हणतात.

6] जो आनंद भोगण्यासाठी प्रवास करतो त्याला पर्यटक म्हणतात.

7] पर्यटक म्हणजे एक रात्रीपेक्षा जास्त कालावधीसाठी भेट देणं ज्याचा उद्देश विश्रांती किंवा सुट्टी, व्यवसाय किंवा पर्यटनाचा इतर कोणताही उद्देश असतो. असा व्यक्ती (WTO)

पर्यटक - Tourist

| | | |
|---|---|---|
| Tornos | Tourns | Tourist |
| लॅटिन | इंग्रजी | इंग्रजी |

पर्यटक म्हणजे सांकिकी मिळवण्याच्या वृत्तीने a] leisure and holidays - विश्रांती / विश्राम फुरसतीचा वेळ आणि सुट्ट्या.

Scanned by CamScanner

* फुरसतीचा वेळ किंवा विश्रांती-(leisure)


कामासाठी जाणं, कामावरुन येणं, झोप, वैयक्तिक कामं व घरगुती काम इत्यादिंसाठी लागणारा वेळ सोडून शिल्लक राहिलेल्या वेळास फुरसतीचा वेळ किंवा विश्रांतीचा वेळ असे म्हणतात. अशा वेळेचा उपयोग मनोरंजन किंवा पर्यटनासाठी केला जातो.

* मनोरंजन Recreation -

फुरसतीचा किंवा फावल्या वेळात व्यक्ति ज्या ज्या क्रिया करतो त्या सर्वांचा समावेश मनोरंजन या संकल्पनेत केला ज्यामध्ये प्रवास व पर्यटन यांचा प्रमुख समावेश आहे.

पर्यटनाचे घटक Component of Tourism -

Travel and tourism industries Component
प्रवास व पर्यटन उद्योगाचे घटक :-




Scanned by CamScanner

Date ______
Page ______

## ६ पर्यटन भूगोलाचे स्वरुप व व्याप्ती

पर्यटन उद्योग एक जागतिक व्यवसाय आहे. कच्चा माल कच्चासामग्री इत्यादी घटकांची या उद्योगास गरज नसते. हे सेवाक्षेत्र आहे. आर्थिक सामाजिक व राजकिय महत्व लक्षात घेऊन सर्व देशांनी पर्यटन विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. या व्यवसायाचे परिणाम देशाच्या सर्व घटकांवर होत असतात. अशा या महत्वाच्या उद्योगाचा अभ्यास पर्यटन भूगोलात केला जातो. ज्याचे स्वरुप व व्याप्ती पुढिलप्रमाणे आहे.

## * पर्यटन भूगोलाची व्याप्ती :-

पर्यटन व्यवसाय हा सतत बदलणारा, समकालीन तंत्रज्ञान संस्कृती समाज अर्थव्यवस्था इ. बदलानुसार तोहि बदलत असतो. गेल्या काहि दशकांपासून विशेषतः LPG libralisation उदारीकरण Privatization खाजगीकरण Globalization - जागतिकीकरण

LPG या धोरणामुळे पर्यटन व्यवसायाचे स्वरुप पूर्णपणे बदलले आहे. माहिती व तंत्रज्ञान आणि वाहतूक क्षेत्रातील परिवर्तनामुळे पर्यटन व्यवसाय गतिमान झालेला आहे. परिणामी पर्यटन भूगोलाचे बदलते स्वरुप स्पष्ट करता येते.

1) वैशिष्ट्यपूर्ण स्वरुप
2) वैविध्यपूर्ण स्वरुप
3) मनोरंजन किंवा करमनूक प्रधान स्वरुप
4) गतिशिल किंवा गतिमान स्वरुप
5) आंतरविद्या शाखिय स्वरुप
6) अनुत्पादक स्वरुप
7) हंगामी किंवा कालिक स्वरुप
8) सांस्कृतिक किंवा धार्मिक स्वरुप
9) भौगोलिक स्वरुप
10) ऐतिहासिक स्वरुप

Scanned by CamScanner

1) वैशिष्ट्यपूर्ण स्वरुप

पर्यटन हा व्यवसाय विशिष्ट स्वरुपाचा आहे. प्रवास व वास्तव्य ~~नन~~ किंवा निवास रोजच्या ठिकाणापासून दूर अंतरावर असतात. भ्रमंती मनोरंजन साहस इ. पर्यटनाचे विशेष गुणधर्म आहे. थोडक्यात या व्यवसायात मोठी विविधता आहे. त्यामुळे तो वैशिष्ट्यपूर्ण आहे. परिणामी पर्यटन भूगोलाचे स्वरुपही वैशिष्ट्यपूर्ण होते.

2) वैविध्यपूर्ण स्वरुप

पर्यटन ही विविधतेने परिपूर्ण घटना आहे. वाहतूकीतील विविधता (प्रकार) निवास सेवेतील विविधता तंत्रज्ञानातील बदल रोजगारातील विविध संधी अशा अनेक वैविध्यपूर्ण घटकांमुळे पर्यटन भूगोलाचे स्वरुप विविधतेने वैविध्यपूर्ण मानले जाते.

3) मनोरंजक किंवा ~~म~~ करमनूक प्रधान स्वरुप

पर्यटनाचा मुख्य उद्देश मनोरंजन किंवा करमनूक हा आहे. निसर्गातील अनेक ठिकाणांना भेटी देणे. निसर्गाचा आनंद घेणे साहसी खेळाचा अनुभव घेणे. आनंदासाठी विश्रांती आल्हाददायक वातावरणाचा अनुभव इ. पर्यटन वैविध्यांचा संबंध मनोरंजनाशी असल्याने पर्यटन व पर्यटन भूगोलाचे स्वरुप मनोरंजक असे आहे.

4) गतिशिल किंवा गतिमान स्वरुप :

पर्यटन उद्योग ही एक गतिमान किंवा सातत्याने बदलणारी मानवी आर्थिक क्रिया आहे. सेवा क्षेत्राचा हा महत्वाचा भाग आहे. पर्यटनाचा संबंध प्रवास व स्वर हालचाली उत्साह यांच्याशी असल्याने त्यात गतिमानता असते. बदलत्या तंत्रज्ञानामुळे पर्यटन व्यवसाय ही बदलत असतो. नविन वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन प्रकार तांत्रिक सेवा सुरक्षितता सातत्याने येत असतात त्यामुळे पर्यटन व पर्यटन भूगोलाचे स्वरुप गतिशिल आहे.

Scanned by CamScanner

5] अंतरविद्याशाखिय स्वरुप

अंतरविद्या शाखिय स्वरुपाचा अर्थ वेगवेगळ्या ज्ञान शाखेतील नियम व माहितीचा उपयोग पर्यटनाच्या अभ्यासासाठी करणे असा होतो. नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांची मदत घेऊन पर्यटनाचा अभ्यास पर्यटन भूगोलात केला जातो. त्यामुळे या विषयाचे स्वरुप अंतरविद्या शाखिय आहे.

6] अनुत्पादक स्वरुप

या उदयोगाचा संबंध कोणत्याही जीवनावश्यक उत्पादनाशी नाही या व्यवसायात वस्तूंचे उत्पादन होत नाही. त्यामुळे या व्यवसायास अनुत्पादक व्यवसाय असल्याने पर्यटनाचे स्वरुप अनुत्पादक मानले जाते.

7] हंगामी किंवा कालिक स्वरुप

पर्यटन हा उदयोग हंगामी स्वरुपाचा आहे. पर्यटक विशिष्ट हंगामामुळे पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी प्रवास करतात त्यामुळे या व्यवसायाला हंगामी स्वरुप प्राप्त होते. थंड हवेच्या ठिकाणी उन्हाळ्यामध्ये तर वाळवंटी प्रदेशात हिवाळ्यात पर्यटन व्यवसाय तेजित असतो. पर्यटक अल्प काळापासून दिर्घ काळासाठी प्रवास करतात. वाहतूक निवासव्यवस्था, हॉटेल्स खरेदी विक्री इत्यादि पुरक व्यवसाय विशिष्ट हंगामात चालू होतात. त्यामुळे पर्यटन आणि पर्यटन भूगोलाचे स्वरुप हंगामी असते.

8] सांस्कृतिक किंवा धार्मिक स्वरुप

अनेक धार्मिक किंवा सांस्कृतिक ठिकानांना अनुसरुन पर्यटन विकसित होत असते. मंदिर मस्जिद प्रार्थनास्थळे व सांस्कृतिक वारसा ठिकाणी पर्यटन व्यवसायात महत्वाची आहे. परिणामी विषयाच्या स्वरुपावर धार्मिक व सांस्कृतिक घटकांचा परिणाम होतो.

Scanned by CamScanner

9) भौगोलिक स्वरुप

भौगोलिक घटक भूरुपे समुद्रकिनारे जंगल धबधबे हिमाच्छादीत प्रदेश सरोवरे नदीचा संगम, हवामान वन्य पशुपक्षी इ. भौगोलिक घटक पर्यटन व्यवसायात महत्वाचे आहे. पर्यटक हे सर्व ठिकाणांना भेटी देण्यासाठी प्रवास करतात. परिणाम पर्यटनाचा अभ्यास करताना या भौगोलिक घटकांचा विचार केला जातो. त्यामुळे विषयाचे स्वरुप भौगोलिक होते.

10) ऐतिहासिक स्वरुप

ऐतिहासिक घटना, वास्तू, किल्ले इत्यादी ऐतिहासिक घटक पर्यटन व्यवसायात महत्वाची आहे. त्यामुळे पर्यटन भूगोलाच्या स्वरुपाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

वरील मुद्यांच्या आधारे पर्यटन भूगोल या विषयाची स्वरुप किती बहुआयामी आहे. हे स्पष्ट होते.

* पर्यटन भूगोलाची व्याप्ती :-

हा विषय मानवी भूगोलाच्या आर्थिक भूगोलाची उपशाखा आहे. ज्यामध्ये पर्यटन व प्रवास या मानवी विशेष आर्थिक व्यवसायाच अभ्यास केला जातो. या विषयाची व्याप्ती पुढील मुद्यांच्या आधारे समजते.

1) पर्यटन एक मानवी मुलभूत गरज - (Tourism as a Besic Need of Mankind)
2) वाहतूक व पर्यटन (Tourism and transportation)
3) नैसर्गिक पर्यावरण व पर्यटन (Natural environment and Tourism)

1) पर्यटन एक मानवी मुलभूत गरज

1) अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत.
2) विज्ञान, तंत्रज्ञान आर्थिक व सामाजिक बदलानुसार शिक्षण व आरोग्य या मानवाच्या नविन गरजा निर्माण झाल्या.
3) प्रवास ही मानवाची अतिप्राचीन क्रिया आहे. पुर्वीचा प्रवास अन्न वस्त्र निवारा इ. मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी होता.
4) अलिकडच्या काळात निवांत फुरसतीचा वेळ निर्माण झाला आहे.

Scanned by CamScanner

माञ मानसिक व शारिरिक विकारांचे प्रमाण वाढले आहे. परिणामि करमणूक, मनोरंजन, निवांत, विश्रांती व आनंद इत्यादी साठी मानवाचा प्रवास सुरु झाला. त्यातून पर्यटन व्यवसाय सुरु झाला.
WTO च्या मते पर्यटन एक जागतिक मोठा उद्योग आहे. विविध कारणाने मानव जगभर प्रवास करत असतो. त्यामुळे पर्यटन व प्रवास ही मानवाची नविन मुलभूत गरज निर्माण झाली आहे.
पर्यटन भूगोलात पर्यटन एक मानवाची मुलभूत गरज म्हणून अभ्यासली जाते.

2) वाहतूक व पर्यटन (Tourism and Transportation)
वाहतूक म्हणजे वस्तु सेवा किंवा लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाणे त्यासाठी अनेक वाहतूकीचे प्रकार व माध्यमे विकसित झालेले आहेत. जमीन मार्ग किंवा वाहतूक व हवाईवाहतूक, जल वाहतूक, अवकाश वाहतूक असे वाहतूकीचे प्रमुख प्रकार आहेत. या प्रत्येक प्रकारामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे वाहतूक मार्ग असतात. उदा. जमीन वाहतूक मध्ये रस्ते व रेल्वे मार्ग इत्यादी, जलमार्ग मध्ये सागरीवाहतूक व अंतर्गत जल वाहतूक इ.
अशा वाहतूकिच्या प्रकारचा व मार्गाचा पर्यटन विकासावर परिणाम होतो. पर्यटन विकास हा मुलतः वाहतूक मार्गाच्या विकासावर अवलंबून आहे. सहज उत्तम सर्व प्रकारच्या वाहतूक मार्गाची उपलब्धता पर्यटन विकासाला चालना देते. वाहतूक व पर्यटन विकास परस्पर पुरक आहेत. म्हणून पर्यटन भूगोलाच्या अभ्यासात वाहतूकिचे प्रकार मार्ग त्यांचा पर्यटन विकासाशी असलेला संबंध व पर्यटन विकासामुळे वाहतूक मार्गाचा विकास या सर्व अंगाचा अभ्यास होतो.

3) नैसर्गिक पर्यावरण व पर्यटन (Natural environment and touris
नैसर्गिक सर्व घटकांचा समावेश नैसर्गिक पर्यावरणात होतो. भूरुपे वनस्पती, प्राणी, जलाशय, हवामान इत्यादी नैसर्गिक भूरुपे घटकांच्या सौंदर्याला अनुसरुन पर्यटन विकास होतो. अशा वैशिष्ट्यांना भेटी देणे मानवाची प्रवृत्ती आहे. निसर्गातील विविधता मानवाला

Scanned by CamScanner

सतत आकर्षित करत असते. त्यामुळे नैसर्गिक पर्यावरणाचा पर्यटन विकासा- वर परिणाम होतो. अनेक नविन पर्यटनाचे प्रकार नैसर्गिक घटकांना अनुसरुन अलिकडच्या काळात विकसित होत आहेत. त्यामुळे पर्यटन भुगोलाच्या नैसर्गिक पर्यावरण हा प्रमुख अभ्यास घटक आहे.

4) संस्कृती व पर्यावरण :- (Culture and tourism)

संस्कृती हे मानवी जीवनाचा विकासित होत गेलेला एक महत्वाचा अंग आहे. रुढी, प्रथा, परंपरा, चालीरिती, आहार, पोशाख / वस्त्र आणि एकूणचा जीवन जगण्याची पद्धत याला संस्कृती असे म्हणतात. संस्कृतीतील विविधता आणि काही प्रमुख वैशिष्ट्ये पर्यटकांना आकर्षित करतात. उदा. महाराष्ट्रातील वारलीन पेंटिंग आदिवासी संस्कृतिचा एक नमुना आहे. / वैशिष्ट्य आहे. जो जागतिक पर्यटकांचे आकर्षन बनले आहे. पर्यटन विकासाला पूरक सांस्कृतिक वैशिष्ट्ये अभ्यासून त्याचा प्रचार व प्रसार पर्यटन भुगोलाचा एक अभ्यास विषय आहे.

5) धर्म व पर्यटन :- धार्मिक पवित्र ठिकाणे, प्रार्थना स्थळे, धार्मिक विधी किंवा कर्म कांड करण्याच्या जागा इ. धार्मिक प्रतिक, यात्रा, उत्सव धार्मिक सन या सगळ्यांना अनुसरुन पर्यटन विकास जगभर झालेला आहे. भारत सर्व धर्मांचे पवित्र व प्रार्थनास्थळे / ठिकाण असलेला देश आहे. त्यामुळे धार्मिक पर्यटनाला मोठा वाव आहे. चारधाम, मक्का मदिना (हज यात्रा) ही धार्मिक ठिकाणे लाखो लोक प्रत्येक वर्षी भेटी देतात. त्यामुळे धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची आहे. त्यामुळे धर्म व पर्यटन हा संबंध पर्यटन भुगोलात अभ्यासणे गरजेचे आहे.

* पर्यटन उत्पादन

प्रत्यक्ष वस्तूचे उत्पादन पर्यटन उद्योगात होत नाहित. परंतु पर्यटनाचे खास वेगळे उत्पादन असतात उदा.- टूर पॅकेज (Tour Pak.. हे प्राथमिक उत्पादन आहे. निवास व्यवस्था वाहतूक सेवा व इतर

पूरक सेवा ही पर्यटन उद्योगातील दुय्यम उत्पादने आहेत. त्यामुळे इतर उद्योगाप्रमाणे प्रत्यक्ष वस्तूचे उत्पादन या उद्योगात होत नसले तरी वरील प्रमाणे विशेष उत्पादने असतात. त्या संबंधीचा सर्व बाजूनी अभ्यास पर्यटन भूगोलात करून पर्यटन भूगोलास दिशा देता येते. वरील सर्व मुद्दे विचारात घेता पर्यटन भूगोलाची व्याप्ती म्हणजे अभ्यास घटक व्यापक आहेत.

पर्यटन भूगोलाची व्याख्या सांगून स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

## * पर्यटन व भूगोल संबंध

भूगोलाचे पर्यटनाशी जवळचे नाते आहे. पुढील मुद्यांच्या आधारे हा संबंध स्पष्ट करता येतो.

1) पर्यटन हे विविध भौगोलिक स्थळांविषयी संलंहीत असते. अशा भौगोलिक स्थळांचे वैशिष्ट्य पर्यटकांना आकर्षित करतात. उदा. दार्जलिंग पंचमढी माथेरान इत्यादी स्थळांचे हवामान व निसर्ग सौंदर्य ठिकठिकाणी पर्यटन केंद्र म्हणून विकसित झालेले आहे.

2) पर्यटन विकासात नकाशांचे महत्व विशेष असे आहे. मार्गदर्शक, नियोजन, प्रवास, नवीन पर्यटन केंद्र शोध, इ. महत्वाच्या घटकांसाठी नकाशे महत्वाचे असतात. नकाशा भूगोल विषयातील एक महत्वाचे साधन आहे.

3) पर्यटन व त्याच्याशी निगडीत इतर व्यवसायांवर भूरचना हवामान इत्यादी भूगोलिक घटकांचा परिणाम होत असल्याने भूगोल अभ्यासक त्याचा योग्य अभ्यास करतात.

4) पर्यटन क्षमता शोधणे व शक्यतेचा अभ्यास भूगोल शास्त्रात व्यतिरिक्त इतर शाखांमध्ये केला जात नाही.

5) स्थलांतर लोकसंख्या भूगोलाचा अभ्यास घटक आहे. स्थलांतराचे परिणाम अनेक असतात. ते दोन भौगोलिक प्रदेशावर होत असतात ज्या ठिकाणावरून स्थलांतर होते आणि ज्या प्रदेशात लोक जातात हे दोन्ही प्रदेश प्रभावित असतात. पर्यटनात स्थलांतर प्राथमिक गरज आहे. ज्याचा अभ्यास सातत्याने करणे गरजेचे आहे, जो भूगोल विषयामध्ये केला जातो.

6) पर्यटनास अदृश्य निर्यात असे म्हणतात. कारण पर्यटक अनेक

Scanned by CamScanner

कला कुसरतीच्या वस्तू आठवण म्हणून घेऊन जातात अशा वस्तूंचा व्यापार व आर्थिक उलाढाल आंतरराष्ट्रीय व्यापाराचा एक भाग म्हणून भूगोल विषयात अभ्यासला जातो.
बॉस या विचारवंताच्या मते पर्यटनामुळे होणाऱ्या स्थलांतराचा स्थानिक लोकांच्या जीवनमानावर वेगवेगळ्या स्वरूपात परिणाम होत असतो. त्याचा अभ्यास भूगोल तज्ञांनी करणे आवश्यक आहे. अशा विविध घटकांच्या आधारे पर्यटन व भूगोल सहसंबंध स्पष्ट करता येतो.

पर्यटन भूगोलाचे महत्व
जॉर्ज यंग यांनी पर्यटन शाप की वरदान या शोध निबंधात पर्यटनाचे महत्व स्पष्ट केले आहे. ते आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरण व संशोधन इ. घटकांशी संबंधीत आहे. पुढील मुद्द्यांच्या आधारे ते अधिक स्पष्ट होते.
1] आर्थिक महत्व
2] परकिय चलन
3] रोजगार निर्मिती
4] उद्योग व व्यापाऱ्यास चालना
5] गुणन परिणाम
6] सांस्कृतिक आदान-प्रदान
7] कलाकुसर व हस्तकला व्यवसाय
8] प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत
9] परस्पर सामंजस्य

Scanned by CamScanner